RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published on : 12 December, 2016 :: Posted at Kandivli(w) Post Office, Mumbai on 14 December, 2016

# अजायब बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : चौदा | अंक : सहावा | डिसेंबर २०१६



गुरुमताची जाण (संदेश) 5

रमत राम (सत्संग) 7

अमृतवेळ (ध्यान-अभ्यासा विषयी संदेश) 31

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहीती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.



# गुरूमताची जाण

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे एक संदेश
संतबाणी आश्रम, १६ पी एस राजस्थान

गुरू अंगददेवजींकडे येऊन एका गुरूमुख प्रेमीने त्यांना विचारले की परमात्म्याच्या मर्जीनुसार घडणाऱ्या घटनांचा खऱ्या अर्थाने स्वीकार करणारा असा कोणी शिष्य आहे का, ज्यास सर्व घडणाऱ्या घटनांची पूर्वकल्पना आहे की वर्तमानामध्ये काय घडत आहे व भविष्यामध्ये काय घडणार आहे?

गुरू अंगददेवजी त्या प्रेमीस म्हणाले की तू गुजरातमध्ये रहात असलेल्या भाई बुखारी नामक माझ्या सेवकाकडे जा. त्यानुसार तो प्रेमी भाई बुखारीच्या घरचा पत्ता घेऊन त्याच्या घरी पोहचला. त्यावेळी भाई बुखारी चटई विणत होता. त्या प्रेमीने गुरूमुख प्रेमी भाई बुखारीस नमस्कार करून तेथेच बसला. भाई बुखारी आपल्या चटई विणण्याच्या कामात मग्न होता. त्याचे काम पूर्ण झाल्यावर त्याने प्रेमीस विचारले, ''बोल बंधु! कसे येणे केले? या गरीबाच्या झोपडीमध्ये आल्याबद्दल तुझा मी आभारी आहे''

गुरूमुख प्रेमी म्हणाला, ''मी तुमच्या दर्शनासाठी आलो आहे.'' भाई बुखारी त्यास म्हणाला की माझ्या मुलाचा विवाह आहे. ही मिठाई व ही वस्त्रं आहेत तसेच नववधुसाठी हे दाग-दागिने आणलेले आहेत. हे सर्व दाखवून झाल्यावर भाई बुखारीने त्या प्रेमीस लाकडाची तिरडी आणि श्वेत वस्त्र दाखविले आणि म्हणाला की माझ्या मुलाचा लवकरच मृत्यू होणार असून त्याची या तिरडीवरून अंतयात्रा काढली जाईल.

तो गुरूमुख प्रेमी विचार करू लागला! याला सर्व घटनांची पूर्वकल्पना असूनही, हा आपल्या मुलाचा विवाह का बरे करीत आहे? हा जे काही सांगत आहे, यामध्ये किती सत्य आहे हे आपण पाहू या तरी! कारण जे स्वत: श्रद्धाळू नसतात ते इतरांच्या श्रद्धेवरदेखील विश्वास ठेवत नाहीत.

वेळ आल्यावर विवाहासाठी वऱ्हाड गेले. मुलीच्या घरातील मंडळींनी विवाहानंतर मुलीस तिच्या सासरी रवाना केले. हिंदुस्थानातील प्रचलीत लग्न रितीरीवाजाप्रमाणे सर्व काही झाले. घरी परतल्यावर एक–दोन दिवसांनी नविन लग्न झालेल्या मुलाचे निधन झाले. तिरडी व श्वेत वस्त्र अगोदरपासूनच तयार होते. त्या मुलाचे अंतिमसंस्कार करण्यात आले. हिंदुस्थानी रीतीनुसार अंतिमसंस्कारानंतर घरी आल्यावर लोकांना बसण्यासाठी कापड अंथरले जाते त्यानुसार भाई बुखारीने विणलेली चटई अंथरून त्यावर सर्वजण बसले.

कुणी म्हणाले, खूप वाईट झाले. नुकताच मुलाचा विवाह झाला होता, ज्यासाठी खूप खर्च झाला. मुलगा तरुण होता. परमात्म्याने त्यास न्यायचेच होते, तर विवाहापूर्वीच नेले असते तर बरे झाले असते. सर्वांनी तेथे सहानुभूतीपूर्वक उद्गार काढले, परंतु भाई बुखारी शांत होता.

एकांतामध्ये नेऊन त्या गुरूमुख प्रेमीने भाई बुखारीस विचारले,''हा काय प्रकार आहे? जर तुला सर्व घटनांची कल्पना होती व तू कफन आणि बसण्यासाठी चटईदेखील तयार केली होतीस, तर इतका थाटमाट करण्याची तुला गरज काय होती? तू ध्यान–अभ्यास करून अंतर्यात जातोस तर मग ही वेळ तू का टाळली नाहीस? तू स्वत: जरी ही दुर्घटना टाळू शकत नव्हतास तरी तू तुझ्या गुरू अंगददेवजींना तशी विनंती केली असतीस, तर त्यांनी ही अशुभ वेळ टाळली असती.''

भाई बुखारी हसून म्हणाला, ''तो शिष्यच नाही, तो सत्संगीच नाही, जो आपल्या पारमार्थिक कमाईचा वापर अशा गोष्टींसाठी करतो किंवा आपल्या गुरूंना विनंती करतो की माझे दु:ख निवारण कर. हे शिष्यत्व नसून, स्वार्थपरायण आहे. स्वार्थ–पूर्तीनंतर प्रेम संपून जाते.''

***

# रमत राम

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू नानकदेवजी महाराजांची वाणी
मुंबई – ९ जानेवारी, १९९५

माझा परमपिता परमात्मा सावन–कृपालजींच्या चरणी नमस्कार असो, ज्यांनी अपार कृपाकरून या आत्म्यास शांती दिली आणि जन्मोजन्मांतरीची परमात्मा भेटीची तळमळ शमविली.

प्रियजनहो, खरे आभार ध्यान–अभ्यास करून अंतर्यात जाऊनच करू शकतो, परंतु बाह्य स्वरूपात आभार व्यक्त करणे हे देखील चांगलेच आहे. जो बाह्यरित्या स्वत:चे दोष कबूल करतो, तो दोष त्यागण्याचादेखील प्रयत्न करतो. जो बाह्यरित्या आभार व्यक्त करतो, तो अंतर्यातही जाऊन तना–मनाने आभार व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. तुमच्यासमोर गुरू नानकदेवजींची वाणी सादर केली जात आहे, जी काळजीपूर्वक ऐकण्यायोग्य आहे:

**घर रहो रे मन मुगध इयाने।। राम जपो अंतरगत ध्याने।।**

गुरू नानकदेवजी महाराज आपणांस प्रेमाने सांगत आहेत, ''परमात्म्याने आपल्या नेत्रांमागे आडपडदा लावून आपणांस बाहेर काढून टाकले आहे आणि स्वत: वज्रद्वार लावून आतमध्ये बसला आहे. आपण जागृतावस्थेमध्ये बाहेर भटकत असतोच, शिवाय निद्रावस्थेतही स्वप्नांद्वारे बाहेर भटकतो. आपण जप–तप करतो बाह्यजगात निरनिराळ्या तीर्थस्थानांवर जातो. अशा रितीने भटकता–भटकता अनंत युगे लोटली आहेत, तरीही आजपर्यंत आपणांस अंतर्यात जाण्याचा मार्ग वा साधन सापडले नाही.''

आपण बाह्यजगात करीत असलेल्या कर्मांचे पाप अंतरात जाते, परंतु आत्मा काही अंतरात जात नाही. संत प्रेमाने सांगतात, ''सर्व पापांना बाहेर काढून टाकणाऱ्या औषधाचे नांव नाम आहे. सतगुरूंचे नाम सर्व पापांवर इलाज करणारे औषध असून, तुम्ही सतत राम नामाचा जप करा.''

प्रत्येकाच्या देहात राम वसलेला आहे. ध्वनीस्वरूपाने तो आपल्या सर्वांच्या अंतर्यात गुंजत असून त्याने वाणीचे रूप धारण केलेले आहे. गुरू नानकदेवजींनी त्याचे वर्णन रब्बी बानी, धुर की बानी तसेच हरिकीर्तन असे केलेले आहे. त्या रामनामाचा जप आपण करावयाचा आहे. राम हा एखादा शब्द नसून या विश्वाची रचना करणारी शक्ती आहे.

## लालच छोड रचो अपरंपर इयों पावो मुकत दुआरा है।।

गुरू नानकदेवजी सांगत आहेत, ''या बाह्यजगातील वस्तूंबद्दलचे अवाजवी आकर्षणाचा त्याग करा, सर्व त्रासांचे ते मूळ कारण आहे. त्या आकर्षणापोटीच आपण धन-संपत्ती जमा करून महाल-बंगले बांधतो. हे आकर्षणच आपणांस या जगामध्ये अडकवून ठेवते. मृत्यूसमयी आपल्या सोबत काहीच जात नाही. किंबहुना आपण जे काही आयुष्यभर संग्रह करीत रहातो ते सर्व त्यागून जात असता त्यास पाहत आपण रूदन करतो.'' कबीर साहेब सांगतात:

***कामी, क्रोधी, लालची इनसे भक्ति न होय।***

लालची मनुष्य भक्तीभावाकडे कधी वळत नाही. इतिहासात नोंद आहे की महमूद गजनवीने हिंदुस्थानावर १७-१८ वेळा हल्ला केला व येथून प्रचंड धन-संपत्ती लुटून आपल्या देशात घेऊन गेला. मृत्यु कोणाची गय करीत नाही. जेव्हा मृत्यू समोर उभा ठाकतो, तेव्हा आपले मन अंतरातूनच साक्ष देते की तू तुझे अमूल्य जीवन वाया घालवलेस.

महमुद गजनवीने त्याच्या राजकर्मचार्यांना आदेश दिला, ''मी जी काही धन-संपत्ती हिंदुस्थानामधून लुटून आणली आहे, ती येथे एका बाजूला व्यवस्थीत मांडा, जेणेकरून मी याजगातून जात असता त्या संपत्तीस निरखू शकेन.'' सर्व धन-संपत्ती मांडून झाल्यावर, एका पालखीत बसून महमुद गजनवीने ती न्याहाळून पाहिली व टाहो फोडून रडू लागला व म्हणाला की या धन-संपत्तीच्या प्राप्तीसाठी मी लाखो स्त्रियांना विधवा केले, लाखो

मुलांना अनाथ केले. अखेरीस माझ्या सोबत ही धन–संपत्ती न जाता तिच्या प्राप्तीसाठी केलेले पापच माझ्यासोबत जात आहे. त्याने राजकारभाऱ्यांना सांगितले की मृत्यूनंतर माझे हात कफनाच्या बाहेर काढून जमिनीच्या दिशेने करून ठेवा आणि सोबत घोषणा द्या:

***जुल्म साथ है खाली हात है।***

माझे जे काही होईल ते मी भोगेनच, परंतु कमीतकमी जगास हा तरी धडा मिळेल की महमुद गजनवी जेव्हा या जगातून गेला, तेव्हा त्याचे दोन्ही हात रिकामेच होते.

कबीर साहेब सांगतात, ''मनुष्य हाताची मुठ बंद ठेऊन या जगात जन्म घेतो आणि जाताना मात्र रिकाम्या हातानेच जातो.'' गुरू नानकसाहेब सांगतात की सर्वप्रथम आपण लालच त्यागा. सुरवाती–सुरवातीला आपणांस त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. जर आपण लालच सोडण्याचा प्रण केला व सोबत नामाची कमाई करीत राहिलो, तर आपणांस अंतर्यातूनही मदत मिळते आणि हळूहळू आपली विचारधारा बदलण्यास सुरूवात होते.

**जिस बिसरिऐ जम जोहण लागै। सभ सुख जाहें दुखा फुन आगै।**

आपण सांगत आहात, ''रामाचा आपणांस विसर पडल्यास यम आपणांस अशा दृष्टीने पाहतो, जसे मांजर उंदराकडे पाहते, ससाणा चिमणीकडे पाहतो, ज्याप्रमाणे चित्ता त्याच्या भक्षावर झडप घालतो, त्याचप्रमाणे काळ आपल्या पाठी लागलेला असतो. आपणांस कल्पनाही नसते की आपला कधी अपघात होईल, निद्रावस्थेतच कधी हृदयाचे कार्य थांबेल, कधी विमानामध्ये तांत्रिक बिघाड होऊन ते कधी जमीनीवर येऊन आदळेल? आपणांस जरी काळाचा विसर पडला, तरी तो काही आपणांस विसरत नाही. रामास विसरल्याने आपणांस दु:खास सामोरे जावे लागते, कारण रामरूपी परमात्माच सुखांचा भंडारी आहे.''

## राम नाम जप गुरमुख जीअड़े एह परम तत्त वीचारा हे।

सर्व संतांचे एकमुखाने आपणांस सांगणे असते की तुम्ही गुरूमुखांच्या मदतीने राम नामाचा जप करा. गुरूमुखच आपणांस सांगतील की आपण कशा रीतीने **रमत रामाशी** एकरूप व्हावे? राम काही एखादा शब्द नाही. गुरूसाहेब वाणीमध्ये सांगत आहेत:

***राम राम सबको कहे कहेयां राम ना होए।***
***गुरू प्रसादी राम मन बसे तां फल पावे कोए।।***

एखाद्या महात्म्याने कृपा करून आपणांस जर **रमत रामाशी** जोडले, तरच त्या रामाशी एकरूप होऊन आपण मुक्ती प्राप्त करवून घेऊ शकतो. मनुष्याच्या सान्निध्यात राहिल्याने पोपटदेखील राम-राम म्हणू लागतो, परंतु त्यास त्या रामाचे महत्त्व माहीत नसते. तो पोपट जेव्हा उडून परत जंगलामध्ये जातो, तेव्हा त्यास रामाचा विसर पडतो. त्याचप्रमाणे आपण मुखाद्वारे राम-राम, अल्ला-अल्ला, वाहेगुरू-वाहेगुरू म्हणत असतो, परंतु विषय-विकार, मद्य-मांसरूपी जंगलामध्ये गेल्यावर जे काही आपण अगोदर ज्ञान शिकलेलो असतो, त्याचा आपणांस विसर पडतो.

## हर हर नाम जपो रस मीठा।। गुरमुख हर रस अंतर डीठा।।

आपण प्रेमाने सांगत आहात, ''इतर सर्व प्रकारच्या रसाहून हरिनामाचा रस अधिक मधूर आहे. म्हणूनच त्यास महारस असे देखील संबोधले आहे. आपले मन जरी स्वादप्रिय असले तरी ते कधीच एखाद्या स्वादावर स्थिर राहत नाही.'' ज्यांच्यावर आयुष्यभर आपला स्नेह जडलेला असतो, तेच लोक वेळ आल्यावर आपणांस अप्रिय वाटू लागतात.

आपण अन्नग्रहण करीत असताना, आपणांस त्याहून स्वादीष्ट अन्न दिसल्यास, त्या अन्नाकडे आपण आकृष्ट होतो. त्याचप्रमाणे आपले मन एक स्वाद सोडून दुसऱ्या स्वादाकडे आकर्षित होत राहते. परंतु जेव्हा आपणांस

अंतर्यात नामाचा रस, हरिचा रस, रामाचा रस प्राप्त होतो, तेव्हा इतर सर्व रस आपोआपच दूर सरतात. गुरू नानकसाहेब सांगत आहेत:

***नौं दर धावत नवे दर फीके।***

आपल्या शरीरात दोन नेत्र, दोन कान, नाकाची दोन छिद्रे, मुख तसेच शरीराच्या निम्न भागातील दोन इंद्रियांची छिद्रे आहेत ज्यांचा स्वाद फिका आहे. आपल्या आत्म्यावर स्थूल, सूक्ष्म आणि कारण असे तीन पडदे आहेत. या पडद्यांच्या आड आपला आत्मारूपी पोपट बंदी अवस्थेत आहे. ते तीनही पडदे दूर सारून तुम्ही दहाव्या द्वारी म्हणजे पारब्रह्मामध्ये पोहचावे.

***अमृतरस सतगुरू चुआया, दसवें द्वार प्रकट होय आया।***

बाह्य जगामध्ये आपण अमृतरस प्राप्त करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी आजपर्यंत तो कुणास मिळालेला नाही व भविष्यातही तो कधी मिळू शकणार नाही. संतांच्या सभेमध्येच तो मधुर–रस प्राप्त होतो. संत स्वत: ध्यान–अभ्यास करीत अंतरात जातात आणि त्या रसाचा आस्वाद घेतात. तसेच ते आपणांसही मार्गदर्शन करतात की कशातऱ्हेने आपण या बाह्य जगातील स्वादांचा त्याग करू शकतो आणि अंतरामध्ये जाऊन त्या मधुररसाचा आस्वाद आपण घेऊ शकतो? तो रस इतका मधुर व स्वादिष्ट आहे की तुम्हांस आपोआपच या जगातील सर्व रस स्वादहीन वाटू लागतात.

## अहनिस राम रहो रंग राते एह जप तप संजम सारा हे।।

ज्याप्रमाणे तेलाची धार तुटत नाही, त्याप्रमाणे पारब्रह्मामध्ये पोहचल्यावर खंडीत होणारी आपली वृत्ती अखंडीत स्वरूपाची होते. मग आपण निद्रावस्थेत असो वा जागृतावस्थेत, आपली वृत्ती खंडीत होत नाही.

***मुख की बात सगल स्यों करदा जीव संग प्रभ अपने घर दा।***

असा मनुष्य या जगात कुणाशीही बोलत असेल तरी त्याची तार अंतर्यामधील परमात्म्याशी समरस झालेली असते. ज्याप्रमाणे रहाट, विहीर

आणि रहाट खेचणारे बैल वेगवेगळे असतात, परंतु बैलांच्या गळ्यामध्ये लाकडी धुरा घातल्यावर ते सर्व रस्सीच्या मदतीने जोडले जातात. याचप्रमाणे जो मनुष्य पारब्रह्मामध्ये पोहचतो, त्याचे लक्ष अंतर्यातील शब्दाशी एकरंग होते, जेथे तो अमृत प्राशन करतो. मग आपोआपच त्यास या बाह्यजगातील रस स्वादहीन वाटू लागतात.

**राम नाम गुरबचनी बोलो।। संत सभा मह एस रस टोलो।।**

आपण प्रेमाने सांगता,''आपण जेव्हा तेथे पोहचतो, तेव्हा जप, तप व संयम केल्याने होणारी फलप्राप्ती, आपणांस आपोआपच होते. कारण हत्तीच्या पावलाच्या आकारामध्ये इतर सर्वच प्राण्यांच्या पायाचे आकार सामावतात. आपण आपल्या आत्म्यावरील सर्व पडदे दूर सारून पारब्रह्मात नेणे म्हणजे आपला जप-तप, पूजा-अर्चा आणि संयम पाळल्याप्रमाणेच आहे.''

***नन्ना नाहे भोग नित भोगे, ना डिट्ठा न संभलया।***
***गल्ली हों सुहागण बहने कंत न कबहु मैं मिलया।।***

आपण सांगता,''आपण स्वत:हून नामाशी, परमात्मारूपी रामाशी एकरूप होऊ शकत नाही. महात्मा व वेद शास्त्र ज्या **रमत रामाचा** तसेच नामाचा महिमा वर्णन करतात, ते आपल्या देहातच असल्याने त्याच्याशी मिलाफ करणे काय अवघड आहे, असे तुम्हास वाटत असेल तर ते चुकीचे आहे.''

महाराज सावन सिंहजी महाराज सांगत असत,''नाम जर एखादा साधा शब्द असता, तर पुस्तक वाचून त्याचा जप करता आला असता. एखादी पाच वर्षांची सूत कातू शकणारी साधारण मुलगीही नाम देऊ शकली असती, परंतु तसे नाही. राम एक शक्ती आहे. संत नामाचे भंडारी बनून या जगात येतात. आदिकर्त्या परमात्म्याने ज्यांच्या भाळी नामप्राप्ती लिहिलेली असते, त्याच लोकांना संतांच्या सभेमध्ये, सत्संगामध्ये येण्याचे सौभाग्य लाभते. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

***सन्त सभा कोट गुरू पूरे, धुर मस्तक लेख लिखाए।***

परमात्म्याने जर आपल्यावर कृपा केली नाही तर आपण केवळ विचारच करत राहू, तेथे पोहचणारही नाही आणि जरी चुकून पोहचलो तरी तेथून अभावच सोबत घेऊन येऊ. तेथे जाऊन डुलक्या काढू वा फालतू गप्पा मारून वेळ वाया घालवू. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

***ओह वल छल कर झट लंघाऐ दे।***
***ओहना रिजक न पाया ओत्थे ओहना होरो खाना।।***

तेथे निंदा–नालस्ती केली जात नाही. मद्यप्राशन केले जात नाही म्हणून अशा लोकांना तेथे जाणे आवडत नाही. संतांच्या सभेत तर अवगुण त्यागण्याचा, नाम जपण्याचा उपदेश केला जातो. गुरू नानकसाहेब सांगतात:

***जन नानक कंत रंगीला पाया ते फिर दूख न लागे आए।।***

तेथे आपल्या आत्म्यास पती लाभतो जो सर्व सुखांचा दाता आहे. परमात्मा सर्वशक्तीमान आहे, त्याच्या इच्छेनुसार तो काहीही करू शकतो. तो जड वस्तूस चेतन तर चेतन वस्तूस जड बनवू शकतो. मुर्खास सर्वज्ञानी तर सर्वज्ञानास मुर्ख बनवू शकतो.

परमात्म्याची भक्ती अनमोल संपत्ती आहे. ती काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार आणि दु:खांची नाशक आहे. खऱ्या अमृताची ती दाता आहे. परमात्म्याची भक्ती करणारे जीव धन्य आहेत. परमात्म्याचे भक्त परमात्माहूनही वरचढ असतात. अशा परमात्म्याच्या प्रियजनांची संगत मिळणे आपल्या भाळी लिहिलेली असेल तरच आपणांस लाभते. परमात्म्याची भक्ती करणाऱ्यांना परमात्मा भक्तीचे दान देतो.

## गुरमत खोज लहो घर अपना बहुड़ न गरभ  मंझारा हे।।

गुरू नानकदेवजी सांगत आहेत,''हे जग कधी तयार झाले याचे आपणांस ज्ञान नाही. आपण मनुष्य असूनही आपणांस आईच्या पोटी जन्म घ्यावा लागतो. मृत्यूनंतरही गर्भामध्ये जावे लागते. पशू–पक्ष्याच्या योनीतही आपणांस धर्मराजास सामोरे जावे लागते. त्याचे दूत आपणांस नेण्यासाठी येतात.''

आपण सांगत आहात,''अजूनपर्यंत तुम्ही स्वगृही गेलेला नाहीत, तुमचे मन तुम्हांस बाह्य जगामध्ये भरकटवत आहे. मग आपण आपल्या स्वगृही कसे बरे जाऊ शकतो? आपण स्वत:चा मार्ग त्यागल्यावरच आपण स्वगृही जाऊ शकतो. आपला स्वत:चा मार्ग कोणता आहे? जे मनात येते तसे करणे हा आपला मार्ग आहे. मनाच्या सांगण्यानुसार मद्य प्राशन केले, मनाच्या सांगण्यावरून इतरांशी वाद-विवाद केला, मनाने सांगितल्यावर विषय भोगले. म्हणजेच मन जे सांगते ते आपण करतो. **पाप करण्यासाठी थोडाच वेळ लागतो परंतु त्याची सजा मात्र आपणांस दीर्घकाळ भोगावी लागते.** तुम्ही तुमचे मनमत त्यागून गुरूमुखांच्या मतानुसार वागा कारण गुरूमुख दररोज परमात्म्याच्या घरात ये-जा करतात.'' भाई गुरदास सांगतात:

***गुरूमुख गाड़ी राह चलांदा, गुरूमुख आए जाए निसंग।***

गुरूमुखांना त्या मार्गाचे संपूर्ण ज्ञान असते. आपण जर एखादे काम नित्य-नेमाने करीत राहिल्यास, त्यामध्ये आपणांस प्राविण्य प्राप्त होते. सतगुरू दररोज परमात्म्याच्या घरी ये-जा करीत असतात. तुम्ही तुमचे मन-मत त्यागून सतगुरूंच्या मतानुसार वागा, त्यांच्या मागोमाग वाटचाल करा. ते दररोज परमात्म्यागृही जात असल्याने, तुम्हांसही ते नेतील. जे लोक त्यांच्यासोबत जाण्यासाठी तयार असतात, त्यांना ते सोबत नेतात. त्यासाठी ते आपणांकडून कोणतीही फी घेत नाहीत, तसेच ते उपकार केल्याची जाणीव करून देत नाहीत. नाम घेतल्यावरही जर तुम्ही मनाच्या नादी लागून मद्यपान केले, दुष्कर्म केले, पत्नीला सोडून परस्त्री सोबत विषय भोग केलात, तर काय उपयोग? धर्मपालन करणे जेवढे एका स्त्रीसाठी गरजेचे आहे, तेवढेच ते पुरुषासाठीही आवश्यक आहे. भाई गुरूदास सांगतात:

***देख पराईयां चंगियां धीयां भैणां मावां जाणे।***

गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात:

***पर त्रिया रूप न पेखे नेत्र, साध की टहल सन्त संग हेत।***
***कर्ण न सुने काहू की निन्दा, तो सबसे जाणें आपस को मंदा।।***

जे ऋषी-मुनी मनाच्या नादी लागले, त्यांची पुराणांमध्ये खिल्ली उडविली गेली आहे. परंतु तशी खिल्ली एकाही परम संतांची उडविली गेली नाही. काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार यांची स्थूल गाठ आपल्या नेत्रांच्या मागील बाजूस सूक्ष्म त्रिकुटीमध्ये आहे. मन त्रिकुटीवासी आहे. हे पाच डाकू मनाचे कुटुंबिय आहेत, ते मनाचे सैनिक आहेत, परंतु हे पाचही डाकू जेव्हा मनाची संगत त्यागतात, तेव्हा मन तरी काय करू शकेल?

त्यानंतर तुम्हाला ना वारंवार मातेच्या पोटी जन्म घ्यावा लागेल, ना मृत्यूस सामोरे जावे लागेल, ना धर्मराजासमोर उभे राहावे लागेल. आपण आपले मनमत सोडून जेव्हा गुरूमतावर चालू लागतो, तेव्हा अंतसमयी आपणांस नेण्यासाठी सतगुरूच येतील. त्यावेळी तर गुरू येणार नसतील तर अशा गुरूंकडे जाण्याची गरजच काय? अशा गुरूंना दुरूनच राम-राम करणे श्रेयस्कर ठरते, परंतु तुम्हीच विचार करा! नाम घेऊनही आपण दुष्कर्म करीत राहिलो, तर गुरूंनी काय करावे? कारण त्यांनी आपल्याकडून काही कर्ज तर घेतलेले नसते की जेणेकरून आपण दुष्कर्म करीत राहिल्यानंतरही त्यांनी आपणांस नेण्यासाठी यावेच यावे.

**सच तीरथ नावो हर गुण गावो।। तत वीचारो हर लिव लावो।।**

गुरू नानकसाहेब त्यास कुठे अंतर्यातील तीर्थस्थान, कुठे अमृतसर तर कुठे सेतसुन्न असेदेखील संबोधतात. आपण तेथे जाऊन आपल्या आत्म्यास स्नान घालावे.

**अंत काल जम जोह न साकै हर बोलो राम प्यारा हे।।**

तुमचे सतगुरूंवर प्रेम आहे आणि सतगुरूंनी तुमचे प्रेम रामाशी संलग्न केले असल्यास काळ तुमच्या आसपासही येऊ शकत नाही. माझ्याकडे अनेक प्रेमींची पत्रे येतात तसेच ते मला भेटूनही सांगतात, ज्यांच्या घरचा सदस्य सत्संगी आहे, त्याघरात नाम प्राप्त न झालेल्या मनुष्याच्या मृत्यूच्या वेळेचे वर्णन करून सांगतात की त्यांना तेथे सतगुरूंचे अस्तित्व जाणवले.

कुणी सांगतो की मृत पावणाऱ्या व्यक्तीचा सतगुरूंनी केलेला सांभाळ मी स्वत:च्या नेत्रांनी पाहिला. अशी साक्ष देणारे सत्संगी लोक तुम्हांस आढळतील कारण सामान्यत: सतगुरू आणि सेवकांमध्ये अशा घटना घडतच असतात. परंतु मृत्यूसमयी तेथे कुणी बेसत्संगी उपस्थित नसावा. तसा असल्यास सतगुरू त्यांच्या नकळत निघून जातात.

जे लोक नियमीत ध्यान-अभ्यास करतात, ते अनेक दिवस अगोदरच स्वत:च्या मृत्यूबद्दल सांगतात. अशा गोष्टी उघडपणे सांगण्यासाठी खरेतर सतगुरूंची परवानगी नसते. मृत्यूसमयी आपल्या आत्म्यास शरीरामधून एकतर सतगुरू काढतात वा यम काढतात. ज्या मुलांनी आपल्या मृत आईचा सतगुरूंनी सांभाळ करताना पाहिलेला असतो, ते भेटतात तेव्हा नेत्रांमधून अश्रु ढाळत म्हणतात, ''आमच्या आईस आणखीन काही दिवस ठेवले असते तर बरे झाले असते.''

महाराज सावन सिंहजींच्या वेळेची अमृतसर येथील ही घटना आहे. तेथे एक सत्संगी मुलगी राहत होती. एके दिवशी त्या मुलीने तेथील लोकांना सांगितले, ''मी आजपासून आठव्या दिवशी शरीर त्यागणार आहे. त्या प्रांतातील कुणालाही नामदान मिळालेले नव्हते. त्यामुळे त्या लोकांनी विचार केला की ही कुणी भविष्य जाणणारी योगी आहे की काय? त्यामुळे त्यांनी दिवस मोजण्यास सुरूवात केली. अखेरीस आठव्या दिवशी त्या मुलीने देह त्याग केला. महाराज सावन सिंहजी त्यानंतर अमृतसर येथे गेले असता, त्या भागातील सर्व लोकांनी नाम घेण्याचे ठरविले. त्यावर महाराजजी म्हणाले, ''तुम्ही तुमचा निर्णय अगोदर पक्का करा.''

आमच्या येथे एक प्रेमी सेवा करण्यासाठी येत असे. त्याचे नातेवाईक त्यावरून त्यास नेहमी टोमणे मारीत असत, की दिवसभर आश्रमात सेवा करण्यासाठी जाता, घरच्या कामावर लक्षही देत नाही. त्याच्या पत्नीस दम्याचा त्रास होत असे. तरीही ती त्याच्या कधी सेवेमध्ये अडसर निर्माण करीत नसे किंबहुना ती त्यास मदतच करीत असे. तिला दम्याचा दौरा



पडला असला तरीही तिच्या पतीस सेवेस जाण्यासाठी उशीर होऊ नये म्हणून काळजी घेई. ती म्हणे तुमच्या सेवेमध्ये खंड पडू नये, तुम्ही जावे.

त्या स्त्रीचा एक भाऊ सत्संगी नव्हता. अंतसमय जवळ आला असता, ती स्त्री म्हणाली की मला नेण्यासाठी कार आली आहे, महाराजजीही आले आहेत. ते सर्व पीरांचे पीर आहेत. तिचा दुसरा भाऊ तिच्या पतीस नेण्यासाठी आश्रमामध्ये आला. त्याच्या चेहऱ्यावर दु:खाचा लवलेशही नव्हता. त्यावेळी आम्ही सर्वजण शेतामध्ये लाकूडतोडीचे काम करीत होतो. तुम्हीच विचार करा! आपली तरुण बहीण लहान मुले–बाळे मागे सोडून निधन पावली तरी त्या भावाच्या चेहऱ्यावर दु:ख नव्हते. अंत्यविधी आटोपल्यानंतर ते सर्वजण माझ्याकडे आले, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर बिल्कूल दु:ख नव्हते. त्यांनी सर्वकाही मला सांगितले. त्या सेवादारास टोमणे मारणारे सर्वजण आता सेवेसाठी आश्रमामध्ये येतात.

सत्यास पुराव्याची आवश्यकता नसते. सतगुरूंच्या सांगण्यानुसार कुणी वागून तर पहा! त्यानंतर सर्व जबाबदारी सतगुरूंची असते. परंतु आपण नाम

घेतो पण पुढे काहीच करीत नाही. डॉक्टरकडून आजारावर उपचार म्हणून आणलेले औषध आपण न घेता जर तसेच कपटामध्ये ठेवले आणि डॉक्टरला दोष देऊ लागलो, तर त्यात डॉक्टरची काय चूक आहे?

**सतगुरू पुरख दाता वडदाणा।। जिस अंतर साच सो शबद समाणा।।**

सतगुरू या विश्वातील सर्वांत मोठे दाता आहेत. ते अतिशय समंजस आहेत. त्यांच्या अंतरात नामाचा खजिना असून परमात्म्याने त्यांना शब्दाचा भंडारी बनविले आहे. सतगुरूंच्या दातृत्वाची बरोबरी कुणीच करू शकत नाही. सत्कार्य म्हणून कुणी विहीर खणतो, कुणी धर्मशाळा बांधून देतो, कुणी यज्ञ करवितो तर कुणी तप करवितो, परंतु या सर्व आपणांस या बाह्य जगाकडे नेणाऱ्या गोष्टी आहेत, ज्या मृत्यूनंतर आपल्या सोबत जात नाहीत. सतगुरू जे दान आपणांस देतात, ते दान अनमोल आहे. ते मृत्युसमयी आपल्या सोबत जाते. ते दान ना चोर चोरू शकतो, ना दरोडेखोर लुटू शकतो, ना अग्नी त्यास जाळू शकते. नामाशिवाय इतर कोणतीही वस्तू आपल्या सोबत जात नाही, आपली साथ देत नाही.

**जिस कौ सतगुरू मेल मिलाए तिस चूका जम भै भारा है।।**

सतगुरू कृपा करून ज्या आत्म्याची शब्दाशी तसेच रामाशी गाठ घालून देतात त्याआत्म्याचे याजगात भूतासारखे पुन्हा-पुन्हा फेऱ्या मारणे बंद होते.

**पंच तत्त मिल काया कीनी।। तिस मह राम रतन लै चीनी।।**

गुरू नानकदेवजी सांगतात की हे शरीर वायू, माती, जल, अग्नी आणि आकाश या पंचतत्त्वांचे बनलेले आहे. ही पाच तत्त्वे एकमेकांचे शत्रू असूनही शरीरात असलेल्या आत्म्यामुळे ते एकसंघ राहतात व शरीरास शोभा येते. त्यामुळेच बंधु-भगिनी, मित्र-परिवार आपला आदर करतात. आपला आत्मा परमात्म्याचा अंश आहे. जेव्हा हा आत्मा आपल्या शरीराचा त्याग करतो, तेव्हा अग्नी अग्नीमध्ये, जल पाण्यात, माती मातीमध्ये, आकाश आकाशामध्ये

जाऊन मिसळून जाते त्यामुळे आपले शरीर एका मातीच्या ढिगाप्रमाणे पडून राहाते. डोळे असूनही ते पाहू शकत नाहीत. पाय असूनही ते हालचाल करीत नाहीत. हे शरीर एखाद्या हडळ वा डाकिणीप्रमाणे भितीवह बनते.

संत सांगतात, प्रिय मुलांनो! तुमच्या शरीरामध्ये किती अनमोल वस्तू आहे जिच्यामुळे तुमच्या शरीरास शोभा येते. परमात्म्याने आपल्यावर कृपा करून ती वस्तू आपल्या अंतरामध्ये ठेवली आहे ती तुम्ही त्याच्या भांडारात नेऊन ठेवावी. सतगुरू या जगात ना एखादा नवीन धर्म बनविण्यासाठी येतात ना येथील सांसारिक वस्तुंचा संग्रह करण्यासाठी येतात. ते तर आपल्या आत्म्याची परमात्म्याशी गाठ घालून देण्यासाठी येतात.

येथे स्त्री-पुरुष, हिंदू-मुसलमान, अमेरिका, आफ्रिका, हिंदुस्थान, युरोप वा कोणत्याही विभागात राहत असल्याचा काहीच प्रश्न उद्‌भवत नाही. कारण सर्वांच्या अंतरामध्ये एकसमान आत्मा आहे. सर्वांचा जन्म-मृत्यू एकाच पद्धतीने होतो. सर्वांमध्ये एकाच प्रकारचे रक्त आणि घाम असतो.

गुरू गोविंद सिंहजी महाराज सांगतात की आपल्या सर्वांचे शरीर एकसमान आहे. पूर्ण महात्मा येथे जाती-पातीची निर्मिती करण्यासाठी येत नाहीत. ते आपल्या आत्म्याची परमात्म्याशी गाठ घालून देण्यासाठी या जगामध्ये येतात. आपण म्हणतो आपणांस कुणा संतांकडे वा गुरूंकडे जाण्याची गरज नाही. प्रियजनहो, गुरू नानकदेवजींच्या गुरू-ग्रंथसाहेबमध्ये ठिक-ठिकाणी, पाना-पानावर गुरू-गुरू असेच लिहिले आहे. आपण सांगता:

***गुरू कुंजी पाहु निवल मन कोठा तन छत।***
***नानक गुरू बिन मन का ताक न उघड़े अवर न कुंजी हत्थ।।***

गुरू नानकसाहेब सांगतात की जोपर्यंत सतगुरू नामरूपी चावी फिरवत नाहीत तोपर्यंत आपले मनाचे वज्रद्वार उघडत नाही. त्यामुळे परमात्मा नेहमी ही चावी असलेल्या महात्म्यांना या जगात पाठवितो. अशा महात्म्यांशिवाय हे जग राहूच शकत नाही. कबीर साहेब सांगतात:

***अग्नि लगी आकाश को झड़ झड़ पैण अंगियार।***
***सन्त न होते जगत में तो जल मरता संसार।।***

आपले सतगुरू महाराज कृपाल सांगत असत, ''सत्याचे बीज कधीच नाश पावत नाही.'' परमात्मा नेहमी त्याच्या प्रियजनांना या जगामध्ये पाठवित असतो. सूर्योदय होऊनही जर घुबडांनी सूर्य पाहिला नाही, तर त्यात सूर्याचा काय दोष? महाराज सावन सिंहजींद्वारा नाम प्राप्त झालेले महात्मा चतुरदास त्यांच्या पुस्तकामध्ये लिहितात:

***ईक दिन सभा उल्लुआं लाई, बैठे मिल नर नारी जी।***
***कोई आखे सूरज नाहीं, कौन करे उजियारी जी।***
***वोरो वारी सभी बोले कर कर सोच विचारी जी।***
***ओन्हां विच ईक वड्डा उल्लू बानी ओस उचारी जी।***
***अज तक सूरज हम नहीं डिट्ठा वड्डी उम्र हमारी जी।***
***जे कोई सूरज सच्चा आखे अकल ओस दी मारी जी।***
***एक हंस टीसी पर बैठा बानी ओस उचारी जी।***
***है प्रभात देख लो सारे लक्खां किरण पसारी जी।***
***चतुरदास ऐह अजब अदालत तीन लोक से न्यारी जी।।***

सर्व शिकली–सवरलेली सुशिक्षित लोकं एकत्र येऊन चर्चा करतात की परमात्मा मुळी अस्तित्वातच नाही. त्यांपैकी इतर सुशिक्षित लोक म्हणतात की आम्ही मोठ–मोठ्या ग्रंथ–पुस्तकांचे अध्ययन केलेले आहे. त्यामुळे या म्हणण्यास आमचे अनुमोदन आहे. अशा उच्चशिक्षित मंडळींना येथे ज्येष्ठ घुबड असे संबोधले गेले आहे. तेथेच एक परमात्म्याचा प्रिय भक्त बसलेला होता. तो म्हणाला, ''प्रियजनहो, परमात्मा तर तुमच्या अंतर्यात आहे. त्यानेच तुम्हाला जीवन दिलेले आहे. तो आपल्या अंतर्यात असूनही त्यास आपण समजू शकत नाही.''

पप्पू येथे माझ्या शेजारीच बसला आहे. आम्ही कॅनडा येथे गेलो असता, आम्हांस भेटण्यासाठी एक हिंदुस्थानी प्राध्यापक आला. त्यास अहंकार

होता की तो एक प्राध्यापक आहे. त्याने सांगितले की त्याचे शिक्षण लाहोर येथे झाले आहे. सुरवातीस तो माझ्याशी पंजाबी भाषेत बोलला. त्यानंतर पप्पूशी पंधरा मिनिटे इंग्रजीमध्ये बोलला. खरेतर माझ्याकडे वेळेचा अभाव होता, तरीही मी म्हटले याचे सर्व म्हणणे ऐकून घ्यावे. तो बोलतच राहिला, मी मात्र शांत होतो. अखेरीस मी त्याच्याकडे जरा शांततेने निरखून पाहू लागलो, तेव्हा मात्र तो रडू लागला.

मी तेथे आठ दिवस राहिलो. त्याने जाऊन आपल्या पत्नीसही आणले. दररोज तो प्रेमाने सत्संग ऐकत असे. मी त्यास एकच गोष्ट सांगितली, ''प्रिय मित्रा, वृक्षाची महानता त्याचे फळ खाल्ल्यानंतरच कळते. प्रथम त्याचे फळ खा. ही पुस्तके लिहिण्या-वाचण्याची बाब नाही.'' गुरू गोविंद सिंहजी महाराज सांगतात:

***वेद कतेब न भेद लिखयो जो गुरू ने गुर मोहे बतायो।***

मला माझ्या सतगुरूंद्वारे मिळालेले ज्ञान वेद-शास्त्रांमध्ये लिहिलेले नाही. गुरू गोविंद सिंहजी अतिशय उच्चशिक्षित होते, फारसीचे संपूर्ण ज्ञान असलेले ते संत होते. त्यांना अंतरातील तसेच बाह्य जगाचेही ज्ञान होते. ते देखील वेद-शास्त्रांचे अध्ययन करून परमात्म्याचे ज्ञान मिळवू शकले असते. परंतु वेदांमध्ये परमात्म्याचा केवळ महिमा वर्णन केलेला आहे. ज्याप्रमाणे सावकाराच्या वहीमध्ये त्याच्या सर्व रुपयांच्या हिशोबाची नोंद असते परंतु त्यात खरे रुपये नसतात. खरे रुपये तर त्याच्या तिजोरीत असतात. तर मग जो सावकाराची वही चोरेल त्यास रुपये मिळतील का?

याचप्रमाणे वेद-शास्त्र परमात्म्याचा महिमा वर्णन करतात, परमात्मा प्राप्तीचे फायदे सांगतात. ज्या महात्म्यांनी वेद-शास्त्रे लिहिलेली आहेत, ते महात्मे परमात्म्यास्वरूप होते. त्यांनी परमात्म्यास प्राप्त करून घेतले होते. त्यांनी वेद-शास्त्रांमध्ये आपणांसाठी ज्या सूचना लिहून ठेवलेल्या आहेत, त्या सूचनांनुसार आपण वाटचाल करणे गरजेचे आहे. कबीर साहेब सांगतात:

***वेद कतेब कहो मत झूठे, झूठघ जो न विचारे।***

वेद–शास्त्र खोटे ज्ञान देत नाहीत, ते सत्य विदित करतात. आता प्रश्न असा आहे की आपण त्यांचे किती अनुकरण करतो. आपण त्यांचे केवळ पठण करतो, परंतु त्यांचा अर्थ समजून घेत नाही.

**आतम राम राम है आतम हर पाईऐ शब्द वीचारा हे।**

आपण प्रेमाने सांगता, ''आत्मा परमात्म्याचा अंश आहे. शब्द–नामाची कमाई केल्यानंतरच आत्मा आणि परमात्म्यामधील फरक आपण दूर करू शकतो. वृक्षाच्या बी मध्ये वृक्ष असतो, तसेच वृक्षामध्येच बी असते. जोपर्यंत आत्मा परमात्म्यापासून दूर असतो, तोपर्यंतच तो आत्मा असतो. परमात्मा मिलनानंतर तो राम बनतो, परमात्मा बनतो.''

**सत संतोख रहो जन भाई।। खिमा गहो सतगुर सरणाई।।**

आपण प्रेमाने सांगत आहात, ''सतगुरूंच्या चरणी येताना तुम्ही सत्य, संतोष व क्षमा धारण करून या. सत्संग ऐकून आपल्या अंतरात धीर उत्पन्न व्हावा व जे काही परमात्मा देतो त्यामध्ये आपण समाधान मानण्यास शिकावे. अहंकार करू नये. कारण अहंकारी व्यक्तीस परमात्मा सचखंडाचे द्वार उघडत नाही. सतगुरूंना शरण जाण्यापूर्वी तुम्ही मद्य–मासांचे सेवन करणे त्यागा आणि कुकर्म करणे सोडून द्या. तुम्ही क्षमेचा श्रृंगार धारण करा, जेणेकरून इतरांच्याही लक्षात येईल की हा कुणा संतांचा सेवक आहे.''

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''पीर स्वतःचा उदो–उदो करीत नाहीत, तर त्यांच्या सेवकांमुळे त्यांचा उदो–उदो होत असतो. संतांचे जेवढे अधिक सेवक सदगुणी असतील तेवढेच जास्त इतर लोक संतांकडून फायदा करून घेतील. संगतमध्ये येताना तुम्ही संतोष, क्षमा धारण करून या, अहंकारास बिल्कूल जागा देऊ नका.''

**आतम चीन परातम चीनों गुर संगत एह निसतारा हे।।**



सतगुरूंच्या संगतमध्ये जाण्याचा हाच फायदा आहे की तुम्ही शब्द–नामाची कमाई करावी.

**साकत कूड़ कपट मह टेका।। अहनिस निंदा करेंह् अनेका।**

आपण प्रेमाने सांगत आहात की साकत व्यक्ती (मद्य–मांसाचे सेवन करणारा गुरूमताच्या विरूद्ध वाटचाल करणारा) जरी संतांच्या संगतीमध्ये आला व त्याने नाम जरी घेतले तरीही त्याची निंदा–चुगली करण्याची सवय मोडत नाही. संत अत्यंत प्रेमाने समजावतात की आपण पापी व्यक्तीची देखील निंदा करणे वाईट आहे. आपण जर नामधारी व्यक्तीची निंदा करू लागलो, तर आपण कोणत्या नरकामध्ये जाऊ? म्हणून आपण कोणाचीही निंदा करू नये. कोणत्याही समाजाची निंदा करण्याचा विचार मनामध्ये आणू नये. जो निंदा करतो, त्याचेच नुकसान होते, त्याला त्या कर्माचा हिशोब द्यावा लागतो व त्याचे फळ भोगावे लागते.

आपल्याकडे येऊन जर कुणी विनंती करू लागला की माझ्याकडून अमुक अमुक वाईट कर्म झाले असून, मला त्यावर उपाय सांगा, जेणेकरून त्यापासून माझी सुटका होईल. अशा वेळी आपण त्यास योग्य मार्गदर्शन करणे आपले कर्तव्य असते. परंतु आपण त्याचीही निंदा करू लागतो.

महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''तुम्ही ज्या व्यक्तीची निंदा करता, त्या व्यक्तीची पापे तुमच्या खात्यात जमा होतात. तसेच तुमची पुण्ये त्याच्या खात्यामध्ये जमा होतात.'' गुरू नानकसाहेब सांगतात:

***निन्दया भली काहूँ की नाहीं मनमुख मुगध करन। मुँह काले तिन निन्दका नर्के घोर पवन।।***

**बिन सिमरन आवेंह् फुन जावेंह् गरभ जोनी नरक मंझारा हे।**

या जगामध्ये वारंवार ये–जा करणे ही निंदकास त्याच्या कर्माची सजा मिळते. तो जन्मास येतो, मरण पावतो.

***तिस अपराधी गत नहीं काई।***

**साकत जम की काण न चूकै। जम का डंड न कबहूं मूकै।।**
**बाकी धरमराय की लीजै सिर अफरयो भार अफारा हे।।**

गुरू नानकदेवजी महाराज, हे सर्व आपणांस भिती घालण्यासाठी लिहित नाहीत. जे त्यांनी स्वत:च्या नेत्रांनी पाहिले, त्याचे ते वर्णन करीत आहेत:

***नानक दास मुख ते जो बोले ई हाँ उहाँ सच होवे।***

सत्संगामध्ये येऊन जो निंदा, अपराध करणे, मद्य–मांस प्राशन करणे आणि कुकर्म करणे त्यागत नाही, तो यमाच्या शिक्षेपासून वाचू शकत नाही. धर्मराजासमोर जेव्हा त्यास उभे केले जाते, तेव्हा त्याच्या कर्मांचा हिशोब धर्मराज त्यास वाचून दाखवितो व म्हणतो, तू हे सर्व केले आहेस तेव्हा आता त्याची सजा तू भोग. त्याच्या कर्मांना अनुसरून योग्य ती शिक्षा भोगण्यासाठी धर्मराज त्यास यथायोग्य योनीमध्ये रवाना करतो।

**बिन गुर साकत कहो को तरया। हौमे करता भवजल परया।**

गुरू नानकदेवजी महाराज अतिशय ठामपणे सांगतात की, मला एक तरी मनुष्य येऊन सांगू दे की हे विश्व तयार झाल्यापासून आजपर्यंत सतगुरू धारण केल्याशिवाय कुणी या भवसागरामधून पार झाला आहे काय? परमात्म्याने हा नियमच बनविला आहे:

***मत कोई भरम भूले संसार, गुरू बिन कोई न उतरस पार।***

कबीर साहेब तर असेही लिहितात:

***कबीर निगुरा न मिले पापी मिले हजार।***
***ईक निगुरे की पीठ पर लख पापों का भार।।***

**बिन गुर पार न पावै कोई हर जपीऐ पार उतारा हे।**

जे लोक असे म्हणतात की आम्ही गुरूंशिवाय मुक्त होऊ हे म्हणजे एखाद्याने बोटीशिवाय समुद्र पार करण्याचा दावा करण्यासारखे आहे.

## गुर की दात न मेटै कोई। जिस बखसे तिस तारे सोई।

गुरू नानक साहेब सांगतात की सतगुरू ज्यांना नामरूपी पास देतात, त्यास धर्मराज अडवू शकत नाही. कारण तो धर्मराजास तो पास दाखवितो. त्यास कुणी जन्म–मरणाच्या फेऱ्यामध्ये अडकवू शकत नाही, कारण त्यास सूट दिलेली असते. ज्याची राजाबरोबर मैत्री असते, त्यास राजा पास देतो आणि सांगतो की प्रिय मित्रा, वाटेतील पहारेकऱ्यास तू हा पास दाखविल्यास तुला कुणी अडवणार नाही. हाच तो नामरूपी पास आहे.

## जनम मरण दुख नेड़ न आवै मन सो प्रभ अपर अपारा हे।

मी अनेकदा सुंदरदासबद्दल सांगत असतो. येथे अनेक प्रेमी बसलेले आहेत ज्यांनी मिस्टर ओबेराय यांचे पुस्तक वाचले आहे. त्या पुस्तकामध्ये भाई सुंदरदास आणि महाराज कृपालजींमध्ये झालेला संवाद छापलेला आहे, तो शेकडो लोकांसमोर झाला होता. सच्चे पातशाह कृपालजींनी भाई सुंदरदासला नेत्र बंद करावयास लावून अंतर्यात दाखवून दिले की दु:खावेदनांनी नरकात कसे आत्मे कण्हत आहेत? तसेच अपूर्ण व ढोंगी गुरूंची किती वाईट परिस्थिती होते? ती माहिती सुंदरदास नंतर नेत्र उघडून सर्व प्रेमींना वर्णन करून सांगे.

सुंदरदास प्रकृतीने धष्टपुष्ट होता. तो महाराज सावन सिंहजींच्या दर्शनासाठी पायीच जात असे. कुणीतरी त्यास म्हटले की,''तू सायकल चालविण्यास शिक नाहीतर मृत्यूनंतर धर्मराजास तू काय उत्तर देशील?'' सुंदरदासने उत्तर दिले, ''माझे धर्मराजाकडे काय काम? माझे सतगुरू सावन सिंहजी आहेत, मी त्यांच्याकडे जाणार आहे. मला नेण्यासाठी ते स्वत: येतील.''

अंतसमयाच्या सहा महिन्यांपूर्वी सुंदरदास मला त्याबद्दल कल्पना देत म्हणाला की माझ्या मृत्युनंतर कुणाला काही खायला घालू नकोस. जे काही खाऊ घालणार आहेस ते आत्ताच घाल, जेणेकरून मीदेखील खाऊ शकेन.

सहा महिन्यांपूर्वीच त्याने नवीन कपडेदेखील शिवून तयार ठेवले होते. हुजूर सच्चे पातशहांच्या कृपेने जेव्हा त्याचा अंतसमय निकट आला, तेव्हा त्याने प्रसाद तयार करण्यास सांगितला. त्यावेळी ७७ आर.बी. येथून काही प्रेमी माझ्याकडे आले होते. मी त्यांना म्हटले की तुम्ही प्रसाद तयार करा, सुंदरदास देहत्याग करून जात आहे.

सुंदरदासने सांगितले की बाबा जयमल सिंहजी आणि महाराज सावन सिंहजी आले आहेत. सुंदरदासकडे पाहून महाराज सावन सिंहजींचे ओझरते दर्शन केल्यासारखे वाटे. तो सहा फूट उंच होता व त्याचे नाक महाराज सावन सिंहजींप्रमाणेच होते. प्रियजनहो, आपण जिवंतपणीच सांगू शकतो की आपले मृत्युनंतर धर्मराजाकडे काय काम?

**गुर ते भूले आवो जावो। जनम मरो फुन पाप कमावौ।**

आपण येथे बसलो आहोत, याचा अर्थ असा होतो की, यापूर्वी कोणत्याही जन्मामध्ये आपली गुरूंशी गाठ झालेली नाही, नाम प्राप्त झालेले नाही. तसेच सतगुरूंना विसरून बेपर्वाईमध्ये राहिल्याने आपण आज या अशांत व दु:खी नगरामध्ये फेऱ्या मारीत आहोत. आपण जन्म घेतो आणि मरणही पावतो. जेथे आपण जन्म घेतला तेथे पापांचे गाठोडे बांधून डोक्यावर लादत गेलो आणि त्यांची परतफेड करण्यासाठी पुन्हा जन्मास आलो.

**साकत मूड़ अचेन न चेतेह् दुख लागै ता राम पुकारा हे।**

आपण सांगत आहात, साकत व्यक्तीचे हृदय काळ्या घोंगड्याप्रमाणे असते. परमात्म्याने अनंत कृपादृष्टी करून मनुष्य-जन्म दिला व खाण्यासाठी कितीतरी अन्नपदार्थ उपलब्ध करून दिलेले आहेत तरीही मनुष्य परमात्म्याचे स्मरण करीत नाही, परमात्म्यापासून दुरावलेला आहे. जेव्हा एखादे दु:ख येते, तेव्हा तो ध्यान-अभ्यासात बसतो, ग्रंथांचे पठणदेखील करण्यास सांगतो. दु:ख आल्यावर तो रामास साद घालतो. कबीर साहेब सांगतात:

***सुख में सिमरन न किया दुख में किया याद।***
***दुखी होय दास की कौन सुने फरियाद।।***

गुरू नानकसाहेब सांगतात की हत्या करून एखादा मनुष्य न्यायाधिशा समोर म्हणू लागला की पुन्हा असे करणार नाही, मला माफ करा तर ते न्यायाधिश असेच म्हणतील की ही सजा तू भोग व यापुढे पुन्हा असे करू नकोस. त्याचप्रमाणे जेव्हा स्वत:स सावरण्याची वेळ होती तेव्हा तू बेपर्वा राहिलास व दु:खाने जखमी झाल्यावर मात्र ध्यान-अभ्यास करू लागलास?

**सुख दुख पुरब जनम के कीए। सो जाणै जिन दातै दीए।।**
**किस कौ दोस देह तू प्राणी सहो अपणा कीआ करारा हे।।**

गुरू नानकसाहेब प्रेमाने सांगत आहेत, ''आज आपण जी सुखं-दु:खं वा श्रीमंती-गरीबी भोगत आहोत, ते आपल्याच कर्मांचे फळ आहे. जर आपण गरीब असू तर सहनशीलता बाळगावयास हवी आणि श्रीमंत असल्यास परमात्म्याचे आभार मानत असता ते उपभोगावयास हवे. आजारपण आल्यास ते परमात्म्याची मर्जी मानून भोगावयास हवे कारण आपल्याच वाईट कर्मांचे ते फळ असते. आपली त्यापासून सुटका व्हावी म्हणून आपण परमात्म्यापुढे लांबलचक प्रार्थना करतो. परमात्म्याने केवळ धर्मराजाची नेमणूक केलेली आहे. जो जसे कर्म करतो त्यास त्याचे फळ भोगावेच लागते.''

**हौमें ममताह करदा आया। आसा मनसा बंध चलाया।।**
**मेरी मेरी करत क्या ले चाले बिख लादे छार बिकारा हे।।**

ज्या कोणत्या जन्मात गेला तेथे मी-माझे करीत अहंकार करीत राहिला व अहंकाराचे गाठोडे बांधून आणले की मी कोणी महान सर्वज्ञानी आहे, धनवान आहे वा सर्वश्रेष्ठ मनुष्य आहे.

**हर की भगति करो जन भाई। अकथ कथो मन मनेंह् समाई।।**
**उठ चलता ठाक रखो घर अपनै दुख काटे काटणहारा हे।।**

गुरू नानकदेवजी महाराज सांगतात, ''ब्रह्मा, विष्णु, शिव आणि इतर देवी–देवतादेखील हरिची भक्ती करण्यासाठी तळमळत असतात. परमात्मा **रमत राम** असून तुम्ही त्या रामाची भक्ती करा. तोच तुमची जन्म–मरणाच्या दु:ख–क्लेशापासून सुटका करू शकतो.''

**हर गुर पुरे की ओट पराती।। गुरमुख हर लिव गुरमुख जाती।।**
**नानक राम नाम मत ऊतम हर बखसे पार उतारा हे।।**

गुरू नानकदेवजी महाराज सांगत आहेत, ''परमात्मा आपल्यावर कृपा करतो, तेव्हाच आपण परिपूर्ण सतगुरूंच्या चरणी जातो, त्यांचा आसरा घेतो. आपले चित्त सतगुरू रामरूपी परमात्म्यावर एकाग्र करवितात, ज्यायोगे आपण या भवसागरातून पार होतो, आपल्या खऱ्या घरी रवाना होतो. परमात्म्याने आपणांस ज्या घरातून आपल्या नेत्रांमागे आडपडदा टाकून बाहेर काढले होते, आजपर्यंत आपण बाहेरच भरकटत राहिलो. गुरूमुखांनी आपणांस नामस्मरणाच्या मदतीने आपल्या नेत्रांच्या मागे आणून त्या नामाशी जोडले, त्यामुळे आपण आपल्या घरी पोहचलो.''

सुरूवातीस आपण एखाद्या पोपटाप्रमाणे जिव्हेने राम–राम म्हणत होतो. परमात्मारूपी **रमत राम** सर्वांच्या अंतर्यामध्ये सामावलेला असून संत त्यास शरीरा–शरीरामध्ये वास करणारा असे संबोधतात. तो राम झाडांच्या पाना–पानात व्यापलेला आहे. ध्यान–अभ्यास करीत जेव्हा आपण अंतर्यात जातो, तेव्हा आपणांस अनुभवयास मिळते की राम चिमणीतही आहे, हत्तीमध्येही आहे, शेळ्या–मेंढ्यांमध्येही आहे व मनुष्यातदेखील वसत आहे. त्यामुळे कोणत्याही संतांनी मांसाहार करण्यास मान्यता दिलेली नाही. संत सांगतात:

***निर्दया नाहीं जोत उजाला।***

गुरू साहेब सांगतात, जे कोणत्याही प्राण्या–पक्षाचा मांसाहार करतात त्यांच्या अंतर्यात ज्योत प्रगट होत नाही कारण प्रत्येकास स्वत:चा जीव प्रिय असतो. तुम्ही पहा, डुकराचा जन्म अतिशय निकृष्ट असतो, तरीही लोकं

जेव्हा त्यास मारण्यासाठी येतात तेव्हा तो बिचारा जीव मुठीत घेऊन किती पळत असतो, चीं-चीं करीत ओरडत असतो. तो त्याच्या बोलीत आर्जव करीत असतो. त्याने तक्रार घेऊन कोणत्या न्यायालयात जावे? तो देखील पूर्वजन्मी धनाढ्य शेठ-सावकार असणाची शक्यता आहे.''

भाई गुरूदासजी एक उदाहरण देऊन समजावतात की एकदा वाघ शेळीला खाऊ लागला असता, ती शेळी खदखदून हसू लागली. वाघाने तिला विचारले, ''तू का हसत आहेस?'' त्यावर ती शेळी म्हणाली, ''आम्हां गवत खाणाऱ्यांची जर ही अवस्था आहे, तर आम्हांला जे खातात, त्यांची कशी अवस्था होईल?'' कबीर साहेब सांगतात:

***बकरी पाती खात है ताकी काढ़ी खाल।***
***जो बकरी को खात है तिनके कवन हवाल।।***

गुरू नानकसाहेबांनी या लहानशा वाणीमध्ये प्रेमाने समजावले आहे की परमात्म्याने आपणांस आपल्या खऱ्या घरातून बाहेर काढून स्वत: आतमध्ये वज्राचे द्वार लावून बसलेला आहे. आपले मन आपणांस बाह्य जगामध्ये भरकटवीत आहे. आपण जप करतो तो देखील आपणांस बाह्यजगातच आणतो, तप करतो तो देखील आपणांस बाह्यजगातच आणतो, पूजा-पाठ करतो तो देखील आपणांस बाह्यजगातच फिरवितो. आजपर्यंत आपण स्वगृही गेलेलो नाही.

गुरू नानकसाहेबांनी आपणांस सर्व दृष्टीकोनांमधून समजावून अखेरीस हाच संदेश दिला आहे की आपण गुरूमुखांद्वारे परमात्म्याच्या कृपेने शब्द-नामाशी लिन झालो, तर आपल्या घरी परत जाऊ शकू.''

परमात्म्याने कृपा करून आपणांस मनुष्य-जन्मरूपी अमुल्य हिरा दिलेला आहे, त्या मनुष्यदेहात बसून रामरूपी परमात्म्याची भक्ती करून आपले जीवन सफल बनविणे आपले कर्तव्य आहे.

***

# अमृतवेळ

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे ध्यान–अभ्यासात बसविण्यापूर्वी प्रेमींना दिलेला संदेश

परमात्म्याने अपार कृपा करून त्याच्या भक्तीसाठी अतिशय सुंदर मनुष्यजन्म देऊन आपणांस सुसंधी दिलेली आहे. आपण परमात्म्याची भक्ती करून आपल्या अंतर्यात वसत असलेल्या परमात्म्यास भेटलो तरच या मनुष्यजन्मरूपी सुसंधीचा आपण फायदा करून घेऊ शकतो.

ज्या महात्म्यांनी आत्मा आणि परमात्म्याचा शोध घेतला त्यांच्या अंतरात अत्यंत दृढविश्वास असतो. ते अशा सहजावस्थेमध्ये पोहचतात, जेथे या जगातील मान–मोठेपणा आणि आदरातिथ्य त्यांच्या खुषीचे कारण बनत नाही किंवा सांसारिक लोकांनी केलेली त्यांची निंदा–नालस्ती त्यांच्या नाखुषीचे कारण बनत नाही. त्यांचा परमात्म्यावर एवढा अढळ विश्वास असतो की त्याच्या आदेशाशिवाय या जगातील पानही हालू शकत नाही. ते निर्भय बनतात. केवळ परमात्म्यासच ते घाबरतात, कारण तो त्यांचा सर्वेसर्वा मालक असतो. ते जगास श्रेष्ठ न मानता त्याऐवजी परमात्म्यास श्रेष्ठ मानतात. परमात्म्याची मर्जी मानून त्याच्या नांवाखाली सर्वकाही सहन करतात.

कबीर साहेब सांगतात, ''मनुष्य–जन्म हा मौल्यवान हिरा आहे. तो वारंवार लाभत नाही. ज्याप्रमाणे पिकलेले फळ झाडावरून जमिनीवर पडल्यानंतर ते पुन्हा फांदीवर लागू शकत नाही त्याचप्रमाणे मनुष्य–जन्माची संधी एकदा का आपण गमावली, तर ती संधी वारंवार मिळत नाही.''

गुरू नानकदेवजी सांगतात, ''आपण दिवस खेळण्यामध्ये तर रात्र झोपण्यात वाया घालवितो. मनुष्य–जन्म हिरा आहे, तर विषय–विकार कवड्यांसमान (मूल्यहीन) आहेत. आपण या कवड्या मिळविण्याच्या नादात हा मनुष्य जन्म गमावून बसतो. या जगापासून प्राप्त करण्यायोग्य कोणत्या

किंमती गोष्टी असतील तर त्या म्हणजे परमात्म्याची भक्ती आणि परमात्म्याचे प्रेम. परमात्म्याची भक्ती आपण बाजारातून विकत घेऊ शकत नाही, शेतांमध्ये उगवू शकत नाही वा सत्तेच्या जोरावर प्राप्त करून घेऊ शकत नाही.''

काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार हे पाच दरोडेखोर मनुष्यास एखाद्या वानराप्रमाणे नाचवित असून, प्रत्येक आत्म्यास त्यांच्या अंमलाखाली आणीत आहेत. शब्द-नामाची भक्ती आणि सतगुरूंची शरणागती हेच दोन उपाय त्यांच्यापासून सुटकारा मिळवून देऊ शकतात. सतगुरूंवर प्रेम जडल्याने आपण नामाच्या संपर्कामध्ये येतो. नाम प्रगट झाल्यानंतर हे पाचही शत्रू आपला पाठलाग करणे सोडून देतात.

हे सर्व जग खऱ्या सुख-शांती आणि मान-मोठेपणा मिळविण्यासाठी धावपळ करीत आहे परंतु या जगातील मान-मोठेपणामागे खूप दु:खं दडलेली असतात. हे जग मान-मोठेपणा देण्यास तसेच ते हिरावून घेण्यास वेळ घालवित नाही. परंतु खरे सुख, खरा आदर परमात्म्याच्या घरी पोहचल्यावरच आपणांस मिळतो. परमात्मा ज्यास एकदा प्रेम आणि आदर-मान बहाल करतो, पुन्हा कधीच तो हिरावून घेत नाही. ज्यास भक्तीरूपी धन प्राप्त करून घ्यायचे आहे, त्याने परमात्मा प्रिय संतांवर निर्मळ अंत:करणाने प्रेम करणे गरजेचे आहे. ते प्रेम वरवरच्या देखाव्यापुरते नसावे.

भक्तीरूपी धन ज्यांना प्राप्त होते ते परमात्म्याचे खास प्रतिनिधी असतात. त्यांना परमात्म्याने आशीर्वाद दिलेला असतो, परमात्मा तेथे स्वत: प्रगट झालेला असतो. स्वामीजी महाराज सांगतात:

***गुर का ध्यान धर प्यारे बिना इस नहीं छुटना।***

जोपर्यंत आपण अशा महात्म्यांवर निर्मळ अंत:करणाने प्रेम करीत नाही, तोपर्यंत आपण मन-इंद्रियांच्या पातळीवरून वर येऊ शकत नाही, आपल्या अंतरामध्ये परमात्म्याप्रती प्रेम जागृत होत नाही. ज्या वस्तूचा आपण शोध घेत असतो, ज्या वस्तूच्या प्राप्तीसाठी हे जग जंगल-पर्वतांमध्ये

भरकटत असते आणि मंदिर–मशिदींमध्ये फेऱ्या मारीत असते, ती वस्तू आपल्या अंतर्यात आपली वाट पाहत आहे. परमात्म्यास भेटण्याची आपल्या अंत:करणामध्ये जर खरी आस, खरी तळमळ लागलेली असेल, तर बाह्य जगामधून आपले लक्ष दूर सारून, आपण अंतरामध्ये जाणे गरजेचे आहे. ज्या वस्तूचा शोध आपण घेत असतो, ती वस्तू आपणांस अंतर्यात नक्कीच मिळते. त्यामुळे आपणांस शांती लाभून आपले बाहेर भटकणे थांबते. या जगातील वस्तूंच्या प्राप्तीसाठी भरकटणारे आपले मन शांत, एकाग्र होते आणि आपल्या घरी बसून राहते. गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात:

***राम नाम मन बेधया अवर की करी विचार।***

भीखासाहेब त्यांच्या वाणीमध्ये सांगतात:

***भीखा बात अगम की, कहन सुनन में नाहें।***
***जो जाणें सो कहे ना, कहे सो जाने नाहे।।***

ही गोष्ट अंमल करण्याची आहे. जे करतात ते परमात्म्यास प्राप्त करून घेतात. जे परमात्म्यास प्राप्त करून घेतात ते या जगास महात्मा बनून वा कोणत्याही पाखंडाचे प्रदर्शन करीत नाहीत. ते अंत:करणापासून तसेच बाहेरूनही निर्मळ असतात. ज्यांना ज्ञान असते ते बोलत नाहीत. ज्यांना ज्ञान नसते, ते मात्र नक्कीच लोकांना जाहीरात करून सांगतात की या! आम्ही तुम्हाला ज्योत, परमेश्वर दाखवितो. भोळी जनता कर्तुत्वास महत्त्व देत नाही. परंतु ज्यांनी स्वमेहनत केलेली असते, ते परमात्म्याचे प्रियजन लोकांना सांगतात, ''सज्जनहो, संतमत हे स्वत:मध्ये सुधारणा घडविणारा मार्ग आहे. हा अंमलबजावणीचा मार्ग असून देखावा करण्याचा नाही.''

बाहेर कोणत्याही प्रकारच्या आवाजाकडे लक्ष देऊ नका. मनास तुमच्या तीसऱ्या तिळावर एकाग्र करा. अभ्यासास ओझे न समजता प्रेम–भावाने ध्यान करा.

***

# धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
मुंबई तसेच संत–बानी आश्रमातील सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिति

## मुंबई शहरातील सत्संगाचा कार्यक्रम

गुरुप्रिय साधुसंगत,

परमसंत अजायब सिंहजी महाराजजींच्या अपार कृपेने यंदा मुंबई शहरात सत्संगाचा कार्यक्रम **बुधवार दि. ४ जानेवारी २०१७ पासून रविवार दि. ८ जानेवारी २०१७** पर्यंत खालील पत्त्यावर होईल. सर्व सत्संगी बंधू–भगिनींचे या कार्यक्रमात स्वागत आहे. सर्व गुरूप्रेमी बंधु–भगिनींच्या चरणी नम्र विनंती आहे की बाबाजींच्या मधुर आठवणीत होणाऱ्या या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ३ जानेवारी २०१७ रोजी सायंकाळी किंवा ४ जानेवारी २०१७ रोजी सकाळी खालील पत्त्यावर पोहोचून नामस्मरणाचा तसेच संत वचनांचा लाभ घ्यावा. परमपुज्य संत अजायब सिंह महाराजजींचा **भंडारा ८ जानेवारी २०१७** रोजी साजरा केला जाईल.

**भूराभाई आरोग्य भवन,**
**शांतीलाल मोदी मार्ग, मयुर सिनेमाजवळ,**
**कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०६७**
**फोन नं.: ०९३२४६७०३०१, ०९८३३००४०००, ०२२–२४९६५०००**

## सन्तबानी आश्रम १६ पी एस राजस्थान येथील कार्यक्रम

**२३ डिसेंबर ते २५ डिसेंबर २०१६**
**०२ फेब्रुवारी ते ०६ फेब्रुवारी २०१७**